माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०२६/M/००००८५

अपिलार्थी श्री. राजेश जगन्नाथ मसुरकर

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (विशेष कक्ष-१) मुंबई शहर
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (विशेष कक्ष-१) मुंबई शहर
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२६

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्ज दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक	प्रथम अपील दिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
०७.१०.२०२५		११.११.२०२५	

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १२.०१.२०२६ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. ०७.१०.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:-

(१) "बृहन्मुंबई महानगरपालिका जी/ दक्षिण विभाग क्र. सहाजीज/३२२/ एस. आर. (मालमत्ता) दि.०५.१२.२०२६ रोजीचे पत्र.

(२) पुरवणी परिशिष्ट-२ बृहन्मुंबई महानगरपालिका जी/ द विभाग, महालक्ष्मी SRA सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, वरळी, मुंबई- ३० या दोन प्रतीच्या अनुषंगाने पुढील माहिती व छायाप्रती उपलब्ध करून द्यावी.

(१) पुरवणी परिशिष्ट- २ नुसार दिगंबर रामचंद्र कुमठेकर हे अ.क्र. १८३३ वर निवासी कारणास्तव अपात्र आहेत. पात्रता बाबत आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती व छायाप्रत मिळावी.

(२) दिगंबर रामचंद्र कुमठेकर यांना अ.क्र. १८३३ वर निवासी कारणास्तव पात्रता निश्चित केलेल्या आदेशाची छायांकित प्रत मिळावी."

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ११.११.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

..२/-

३. सदर प्रकरणी अपिलार्थींनी माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (विशेष कक्ष- १) मुंबई शहर, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा, मुंबई नमुद केल्याने आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (विशेष कक्ष- १) मुंबई शहर, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा, मुंबई यांना सुनावणी नोटीस निर्गमित केले. आजच्या सुनावणीस सदर जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

४. आज अन्य प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (विशेष कक्ष- ३), सुविधा कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा, मुंबई सुनावणीस उपस्थित होते. सदर प्रकरणाचा माहिती अर्जाचा विषय त्यांच्याशी संबंधीत आहे. त्यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्या अभिलेखावर सदर प्रकरणी माहिती अर्ज व प्रथम अपील अर्ज उपलब्ध नाहीत. आयोगाच्या अभिलेखावरील उपलब्ध माहिती अर्ज व प्रथम अपील अर्ज जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आले.

५. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (विशेष कक्ष- ३), सुविधा कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा, मुंबई यांनी अपिलार्थींच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध माहिती/ उत्तर अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वयेनोंदणीकृत टपालाने निशुल्क पाठवावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

१) **जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

२) **अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

मुंबई
दिनांक : १५.१०.२०२६

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

प्रत:- जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (विशेष कक्ष- ३), सुविधा कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा, मुंबई.